<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ३२/२०१२ मधील नि. १५५ खाली आदेश</u>

प्रस्तुत दावा वादीने वाटप, ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**०२.** सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ विठ्ठल सदाशिव गोळे हे दि.०१-०७-२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारसांना याकामी सामील करणे न्यायाचे व गरजेचे झाले आहे. सदर प्रमाणे वादी वारसांना दाव्याचे कामी दाखल करुन घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर प्रतिवादी क्र. ६ यांचे वारसांना दाव्याचे कामी दाखल करुन न घेतल्यास वादी वारसांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सदरील प्रतिवादी वारसांना सदर दाव्याचे काम पुढे चालविणे आवश्यक व गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी क्र. ६ यांचे वारसांना दाव्याच्या कामी सामील करुन घेण्याचा हुकूम व्हावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** सदर अर्जावर प्रतिवादी यांनी मागील बाजुस म्हणणे दिले आहे की, योग्य ते आदेश पारित करण्यात यावे.

**०४.** वादी यांचा अबेटमेंट सेट असाईड (नि.क्र.१५३) चा अर्ज व विलंब माफी अर्ज (नि.१५१) मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. मुळ दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ६ च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

दि.०४.०१.२०२४.
भोर

Sd/-
(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

**CERTIFICATE**

“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon’ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Order uploaded on | – | 08/01/2024 |